प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान मधील निधीचा विनियोग शासनाच्या फ्लॅगशिप लाभार्थी योगदान (Beneficiary Contribution) योजनांमध्ये लाभार्थी योगदान अदा करण्याकरीता वापरण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्र. डीएमएफ-०६२२/प्र.क्र.४७/उ-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १७ जुलै, २०२६

वाचा: १. केंद्रिय खाण मंत्रालय यांचे आदेश क्र.१६/७/२०१५-एम.व्ही.आय., दि.१६.०९.२०१५
२. शासन अधिसुचना क्र. एमडीएफ-०६१५/प्र.क्र.३४/उ-९, दि.०१.०९.२०१६
३. केंद्रिय खाण मंत्रालय यांचे आदेश क्र.१/६/२०२०-एम.आय.व्ही, दि.१५.०१.२०२४
४. शासन निर्णय क्र. डीएमएफ-०१२४/प्र.क्र.१०/उ-९, दि.११.१०.२०२४
५. शासन अधिसुचना क्र. डीएमएफ-०१२४/प्र.क्र.१०/उ-९, दि.११.१०.२०२४
६. केंद्रिय खाण मंत्रालय यांचे आदेश क्र. ७/५८/२०२३-Mines IV-Part (१), दि.३०.०३.२०२६

प्रस्तावना :-

खाण मंत्रालय, भारत सरकार यांनी खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ मध्ये सुधारणा करून खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ हा शासन अधिसुचना, दि. २७.०३.२०१५ अन्वये अधिसूचित केला आहे.

२. प्रस्तुत खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ च्या कलम ९ (B) मधील तरतुदींनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये खाणबाधित क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरिता जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करणे अपेक्षित आहे. नमुद तरतुदीस अनुसरून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन अधिसूचना संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०१.०९.२०१६ अन्वये राज्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना, रचना व कार्यपध्दती याबाबत नियम विहित करण्यात आले आहेत.

३. केंद्रिय खाण मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भाधीन क्र.३ येथील दि.१५.०१.२०२४ रोजीच्या आदेशानुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषद व व्यवस्थापकीय समितीच्य संरचनेमध्ये बदल संदर्भाधीन क्र.५ येथील अधिसुचनेन्वये तसेच प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सुधारीत मार्गदर्शक सुचना संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत.

तथापि, केंद्रिय खाण मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भाधीन क्र.६ येथील दि.३०.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान मधील निधी शासनाच्या फ्लॅगशिप योजनांमध्ये लाभार्थी योगदान (Beneficiary Contribution) म्हणून देता येईल, अशा सुचना दिलेल्या आहेत. याचबरोबर सदरील आदेशान्वये आरोग्य, शिक्षण, ऊर्जा, भौतिक पायाभुत सुविधा इत्यादी घटकांसाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान मधील निधीचा उपयोग केल्याने राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातील सदरील घटकांसाठीच्या खर्चात बचत होणार असल्याने सदरील बचत होणारा निधी खाण बाधित क्षेत्राबाहेरील जिल्हा व तालुका मुख्यालयांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी वापरण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदरील सुचनांच्या अनुषंगाने कार्यप्रणाली निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

केंद्र तसेच राज्य शासनाच्या फ्लॅगशिप योजनांमध्ये काही रक्कम लाभार्थी योगदान (Beneficiary Contribution) म्हणून देणे आवश्यक असते. परंतु खाण बाधित क्षेत्रातील बहुतांश लाभार्थ्यांकडे सदरील योजनांचे लाभार्थी योगदान देण्याकरीता आवश्यक असणारी रक्कम नसल्यामुळे अशा योजनांपासून वंचित असल्याची बाब निर्दशनास आलेली आहे. त्यामुळे प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान मधील निधीचा विनियोग लाभार्थी योगदान (Beneficiary Contribution) योजनांमध्ये खाण बाधित क्षेत्रातील लाभार्थ्यांचे योगदान देयक अदा करण्यास संदर्भाधीन क्र.४ येथील दि.११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.४ मधील नमुद तरतुदींचे तसेच लाभार्थी योगदान योजनांच्या पात्रता निकषाचे पालन करण्याच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, महिला, बालक, वृध्द व दिव्यांग कल्याण इत्यादी घटकांकरीता प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान मधील निधी खर्च केल्यामुळे राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून सदरील घटकांकरीता होणाऱ्या खर्चात बचत होते. त्यामुळे सदरील बचत होणारा राज्य शासनाचा निधी खाण बाधित क्षेत्राबाहेरील जिल्हा व तालुका मुख्यालयांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्याच्या सुचना केंद्र शासनाने दिलेल्या आहेत. त्यानुसार सदरील घटकांसाठीच्या खर्चात बचत होणाऱ्या निधीचा विनियोग खाण बाधित क्षेत्राबाहेरील जिल्हा व तालुका मुख्यालयांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी नियोजन करावे.

३. केंद्र शासनाच्या खाण मंत्रालयाने निर्गमित केलेल्या उपरोक्त सूचनांप्रमाणे सर्व जिल्हा खनिज प्रतिष्ठान यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व कार्यक्षमपणे करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१७११४९५३४२५२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

LAXMIKANT GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELD, 2.5.4.20=413BEECA50B65438C7A037917CCF1F24D8CA684B65640DF6372EA731FFAC4DFC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2026.07.17 11:50:54 +05'30'

(लक्ष्मीकांत ढोके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास आणि गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.मंत्री (खनिकर्म), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (खनिकर्म), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव (खनिकर्म विभाग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग मंत्रालय, मुंबई-३२
७. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
८. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म शाखा, संबधित जिल्हा.
९. उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म, नागपूर/ चंद्रपूर/ छत्रपती संभाजीनगर/ कोल्हापूर.
१०. जिल्हा खनिकर्म अधिकारी (सर्व जिल्हे)
११. निवडनस्ती (उद्योग-९)